नि.दि.दावा.क्र.३२/२०२३
सुशिला बोरकर वि. सहादेव
निशाणी क्र. १२२

प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.३ घनश्याम दशरथ ठाकरे -

<u>साक्षीदाराचा सर तपास प्रतिवादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.पी.टी.गजवे यांच्यातर्फे सुरु-</u>

माझ्या शपथपत्रातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो मला वाचुन दाखविण्यात आला आणि मराठी भाषेत समजावुन सांगण्यात आला. त्यावर माझी सही आहे.

सरतपास पुर्ण.

<u>उलटतपास वादी तर्फे त्यांचे सुविद्य विधीज्ञ श्री. गजभिये यांद्वारे-</u>

२. हे म्हणणे खरे आहे की धनराजने, सहादेव शेंडे याचे नाव कमी करण्याबाबत आणि त्याने आबादी जागेवर अतिक्रमण केल्याबाबत तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे आहे की मी सहदेवचे कोणतेही मालकी हक्काचा पुरावा नसतांना नाव लावले म्हणुन, माझी तक्रार जिल्हा परिषदेकडे मला सरपंच पदावरुन कमी करावे म्हणुन तक्रार करण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की महाराष्ट्र शासनाने, माझ्यावर आणि इतर लोकांवर, गुन्हा दाखल करावा म्हणुन आदेश काढले होते. हे म्हणणे खरे आहे की सहदेवचे पुर्वी कच्चे झोपडे/घर होते आणि आता त्याने पक्के बांधकाम केले आहे. हे म्हणणे खरे आहे की माझ्या शपथपत्रातील कलम ४ मधील मजकुराबाबत मी कोणतेही नोंदणीकृत खरेदीखत पाहिले नाही. मी सरपंच पदावर येण्यापुर्वीच हरिदास ठाकरे आणि मिराबाई ठाकरे यांच्या जागेपैकी काही जागा ग्रामपंचायतीने आबादीसाठी संपादित केली होती. सदर जागा ही हरिदास ठाकरे आणि मिराबाई ठाकरे यांच्या शेतामधील आणि उत्तर बाजुची होती. हे म्हणणे खरे आहे की हरिदास ठाकरे आणि मिराबाई ठाकरे यांची शेती कुराड गावाला लागुन आहे. हे म्हणणे खरे आहे की संपादित झालेल्या जागेच्या उत्तर बाजुला कोराड गावामध्ये जाण्यासाठी सार्वजनिक रोड होता. हे म्हणणे खरे आहे की संपादित जागा आणि सार्वजनिक रोड यांच्यामध्ये असलेल्या जागेमध्ये ग्रामपंचायतीने पाण्याच्या टाक्या बांधल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की सहदेवने पाण्याच्या टाकीला लागुन त्याची झोपडी बांधली होती. हे म्हणणे खरे आहे की पाण्याच्या टाकीला लागुण असलेली जागा ही हरिदास ठाकरे आणि मिराबाई ठाकरे यांची असुन सदर जागा ही आबादी साठी संपादित झालेली होती. हे मला माहित नाही की नविन सर्वेमध्ये, जुन्या जागेमध्ये, जास्त क्षेत्रफळ निर्माण झाले होते. हे मला माहित नाही की सहदेवचे अतिक्रमण काढण्याबाबत,माझ्या पुर्वीच्या पदाधिका-यांची वेळोवेळी सूचना

आणि नोटीसा दिल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की ठाकरेंची संपादित जागा ही आबादीसाठी, नविन घरे लोकांना देण्यासाठी होते.

प्रश्न- सरकारने संपादित जागा ही, ग्रामपंचायतीला ले-ऑउट करुन प्लॉट पाडण्यासाठी सांगितले होते ?

उत्तर सहदेवची जागा सोडुन.

ले-ऑउटचा नकाशा मी पाहिलेला आहे. किती प्लॉट पडले हे मी सांगु शकत नाही. अंदाजे ६१ ते ६२ प्लॉट आहेत. हरिदास ठाकरे सोडुन इतर कोणाचीही जागा रेकार्ड प्रमाणे नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्या शपथपत्रातील कलम ४ आणि ६ मधील मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की सहदेवचे बांधकाम हे ग्रामपंचायतीच्या सार्वजनिक जागेवर, बेकायदेशीर रित्या अतिक्रमण करुन बांधले आहे. हे म्हणणे खरे नाही की मी सरपंच पदावर असतांना सहदेवचे खोटे रेकार्ड बनविले. हे म्हणणे खरे नाही की आज रोजी सहदेवच्या बाजुने खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
माझे समक्ष

SARODE SANDEEP MARUTI

L.A.R. No. 106-2005
Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2026.03.27 17:39:23 +0530

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

दिनांक २५.०३.२०२६.
रामटेक

वि.दि.दावा.क्र. ७४/२०२५
जगदीश वि. रजिष्ट्रार
निशाणी क्र. १२

वादीतर्फे साक्षीदार क्र.२ पुष्पा जगदीश सोनवने -
मी शपथेवर सांगतो की,

<u>साक्षीदाराचा सर तपास वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.ए.डी.भेदरे यांच्यातर्फे सुरु-</u>

माझ्या शपथपत्रातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो मला वाचुन दाखविण्यात आला आणि मराठी भाषेत समजावुन सांगण्यात आला. त्यावर माझी सही आहे.

२. मी माझ्या पुराव्याकामी आधार कार्ड इत्यादी दाखल केलेले आहे. सदर दस्तांना अनुक्रमे नि.क्र. १३ देण्यात येत आहे.

सरतपास पुर्ण.

उलटतपास प्रतिवादी तर्फे-

प्रतिवादी गैरहजर-सबब उलटतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
माझे समक्ष

दिनांक ११.०३.२०२६.
रामटेक

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

वि.दि.दावा.क्र. ७४/२०२५
जगदीश वि. रजिष्ट्रार
निशाणी क्र. १४

वादीतर्फे साक्षीदार क्र.३ मनोज तुकाराम बोरीकर -
मी शपथेवर सांगतो की,

साक्षीदाराचा सर तपास वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.ए.डी.भेदरे यांच्यातर्फे सुरु-

माझ्या शपथपत्रातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो मला वाचुन दाखविण्यात आला आणि मराठी भाषेत समजावुन सांगण्यात आला. त्यावर माझी सही आहे.

२. मी माझ्या पुराव्याकामी आधार कार्ड इत्यादी दाखल केलेले आहे. सदर दस्तांना अनुक्रमे नि.क्र. १५ देण्यात येत आहे.

सरतपास पुर्ण.

उलटतपास प्रतिवादी तर्फे-

प्रतिवादी गैरहजर-सबब उलटतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
माझे समक्ष

दिनांक ११.०३.२०२६.
रामटेक

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

वि.दि.दावा.क्र. ७४/२०२५
जगदीश वि. रजिष्ट्रार
निशाणी क्र. १६

वादीतर्फे साक्षीदार क्र.४ करिष्मा मनोज बोरीकर -
मी शपथेवर सांगतो की,

<u>साक्षीदाराचा सर तपास वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.ए.डी.भेदरे यांच्यातर्फे सुरु-</u>

माझ्या शपथपत्रातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो मला वाचुन दाखविण्यात आला आणि मराठी भाषेत समजावुन सांगण्यात आला. त्यावर माझी सही आहे.

२. मी माझ्या पुराव्याकामी आधार कार्ड इत्यादी दाखल केलेले आहे. सदर दस्तांना अनुक्रमे नि.क्र. १७ देण्यात येत आहे.

सरतपास पुर्ण.

उलटतपास प्रतिवादी तर्फे-

प्रतिवादी गैरहजर-सबब उलटतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
माझे समक्ष

दिनांक ११.०३.२०२६.
रामटेक

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : R. J. khobragade (Gr.-II)